# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Region Development Authority, Pune**

PUNEMETROPOLIS

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे- ४११०४४

New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune-411044

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in

## भोगवटा प्रमाणपत्र

( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )

जा.क्र : DP /बीएचए / HAV/ मौ. लोणीकाळभोर/ ग.नं. १७२० /प्र.क्र. ६९३/१९-२० दि.२८/११/२०२२

प्रति,

मे केंन्ट बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. मकसुद एफ नझीर.

पत्ता- लोणीकाळभोर, ता. हवेली, जि. पुणे

मौजे- लोणीकाळभोर, तालुका- हवेली, जिल्हा- पुणे येथील गट नं.१७२० क्षेत्र- ५९००.०० चौ.मी.या जागेवर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसूल शाखा) यांचेकडील आदेश क्र.- पमह/एनए/एसआर/११७३/२०१४, दि.२७/०१/२०१५ अन्वये अकृषिक वापरास व पी.एम.आर.डी.ए./प्र.क्र. ६९३/१९-२०, दि.- १४/०९/२०२० अन्वये आपणास बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. प्रकाश कुलकर्णी लायसन्स नं. CA/९८/२२९०९ परवानाधारक वास्तुविशारद यांच्या देखरेखीखाली रहिवास इमारत विंग "बी" व क्लब हाऊस या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि.- ०५/०९/२०२२ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे .

### उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन

| अ.क्र. | इमारत | मंजूरी प्रमाणे मजले | प्रत्यक्ष जागेवर मजले | मजला | मंजूरी प्रमाणे सदनिका क्र. | प्रत्यक्ष जागेवर सदनिका संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| I. | विंग "बी" | पार्किंग+४ मजले | पार्किंग+४ मजले | पार्किंग | -------- | ------- |
| | | | | पहिला मजला | १०१ ते ११६ | १६ |
| | | | | दुसरा मजला | २०१ ते २१६ | १६ |
| | | | | तिसरा मजला | ३०१ ते ३१६ | १६ |
| | | | | चौथा मजला | ४०१ ते ४१६ | १६ |
| एकुण सदनिका | | | | | ६४ | ६४ |

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune ★ PMRDA



Scanned with CamScanner

| अ.क्र. | इमारत | मंजूरी प्रमाणे मजले | प्रत्यक्ष जागेवर मजले |
|---|---|---|---|
| II. | क्लब हाऊस | तळ + १ मजला | तळ + १ मजला |

महानगर आयुक्त
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.

(मा. महानगर नियोजनकार यांचे मान्येतेने )

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१) ग्रामसेवक, मौजे- लोणीकाळभोर, ता.- पुणे, जि.-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.



Scanned with CamScanner

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि.२८/११/२०२२ रोजीचे पत्र क्र. ६९३/१९-२० सोबतचे

परिशिष्ट 'ब'

१) अर्जदार /सदनिका धारक/गाळे धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/विकासक/ जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

५) केंद्र शासनाच्या Ministry Of Civil Aviation ची अधिसूचना क्र. G.S.R. ७५१ (E) दि. ३०/०५/२०१५ अन्वये इमारतीच्या उंचीवर बंधने घालण्यात आलेली आहेत. AVIATION विभागाच्या COLOUR CODED ZONING MAP नुसार प्रस्तावाखालील जागा P६ झोन मध्ये समाविष्ट आहे. सदर नकाशानुसार कमीत कमी अनुज्ञेय उंचीचा विचार करता महत्तम अनुज्ञेय होणारी उंची ७३७.०० मी. इतकी आहे. तसेच कार्यालयात उपलब्ध असलेला अभिलेखानुसार नकाशानुसार AMSL ५४२.२२ मी. आहे. इमारतीची उंची- २०.०० मी. + ५४२.२२ मी. = ५६२.२२ मी. इतकी येते. त्यामुळे नकाशाप्रमाणे AVIATION विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक नाही. तथापि, त्यानुषंगाने जागेवरील AMSL अनुज्ञेय होणारी इमारतीची टॉप लेवल उंचीबाबतची खातरजमा करणे अर्जदार/ वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

६) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

७) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात रुपांतरण शुल्क, छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

**महानगर आयुक्त**
**तथा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता.**

**(मा. महानगर नियोजनकार यांचे मान्येतेने )**

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA



Scanned with CamScanner